26 JUN 2001

महाराष्ट्र शासन

क्रमांक : व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ जून, २००१.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे/नाशिक/कोल्हापूर/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

**विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात विना अनुदान तत्वावर खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून २००० पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे. परवानगी देण्याविषयीचा शासनाचा निर्णय संबंधित संस्थांना तात्काळ कळविण्यात यावा.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/ प्राशि-३ दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळांना शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळांना परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

मुख्याध्यापिका
भारतीय विद्या निकेतन विद्यालय
सांगवी पुणे-२७

(वि.व.चिंदरकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी अग्रेषित

मुख्याध्यापक
भारतीय विद्यानिकेतन
प्राथमिक विद्यालय

( सन २०००-२००१ या वर्षी(जून २००० पासून) इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमाच्या नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनपत्र क्रमांक व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक : १६ जून, २००१ चे सहपत्र )

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| | जिल्हा - पुणे | | |
| १. | अजित एज्युकेशन सोसायटी, धनकवडी, जि. पुणे | धनकवडी, जि. पुणे | मराठी |
| २. | अरविंद एज्युकेशन सोसायटी, शितोळे नगर, पुणे | सांगवी, पुणे | -"- |
| ३. | गेनबा सोपानराव मोझे ट्रस्ट, पुणे | धानोरी, टिंगरे नगर, हवेली, पुणे | -"- |
| ४. | साने गुरुजी शिक्षण संस्था, पुणे | हडपसर, पुणे | -"- |

मुख्याध्यापिका
भारतीय विद्या निकेतन विद्यालय
सांगवी पुणे-२७

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील तरतूदीनूसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१४-१५ या वर्षापासून इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग जोडण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशातु-२०१५/ प्र.क्र. ४४/१५/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक: १० मार्च, २०१६

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः माशाअ-२००९/(५९९/०९) माशि-१ दि. १५/११/२०११
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशातु-१११२/(२५८/२०१३) / प्राशि-३, दिनांक २/७/२०१३
३) शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशधो-२०१४/(१८१/२०१४) एसएम-५ दि. २४/०३/२०१५
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः प्राशातु-१११२/(२५८/२०१२) प्राशि-३ दि. १३/२/२०१३
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: -एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५ / टिएनटी-२, दिनांक २८/८/२०१५
६) शासन पत्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/ टिएनटी-२ , दिनांक ७/९/२०१५
७) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- प्राशिसं/ इ.८वी -५ वी/ २०१५/ड- ५१२ (अ)१ , दिनांक ४/३/२०१५
८) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा/२०१५/ ५१९४/५१२ (अ)१ /२८२२, दिनांक २४/६/२०१५
९) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा/२०१५/ इ.५वी ८ वी वर्ग/ ५१२ (अ)१ /४५५०, दिनांक १५/९/२०१५
१०) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा/२०१५/ ५१२ (अ)१ /४८५३, दिनांक ५/१०/२०१५
११) शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक- खाप्राशा/२०१५/५१२ (अ)१ /५२७२, दिनांक १९/१०/२०१५
१२) शासन पत्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: आरटीई-२०१५/प्र.क्र.५०/१५/एसएम-५ , दिनांक ७/७/२०१५

प्रस्तावना- १.१ केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतुदींनुसार इयत्ता १ ली ते

मुख्याध्यापिका
भारतीय विद्या निकेतन विद्यालय
सांगवी पुणे-२७

इयत्ता ८वी पर्यंतचे शिक्षण "प्रारंभिक शिक्षण" म्हणून संबोधण्यात येते. संदर्भाधीन क्र.(४) येथील शासन निर्णयान्वये इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी पर्यंतचे शिक्षण " प्राथमिक" व इयत्ता ६ वी ते इयत्ता ८वी पर्यंतचे शिक्षण "उच्च प्राथमिक" शिक्षण अशा प्रकारे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. यास्तव इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरानुरुप व इयत्ता ६ वी ते इयत्ता ८वी च्या विद्यार्थ्यांना उच्च प्राथमिक स्तरानुरुप दर्जाप्रमाणे अध्यापन करणे आवश्यक आहे.

१.२ उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेऊन प्राथमिक शिक्षण प्रणाली (Elementary Cycle) पूर्ण होण्याचे दृष्टीने तसेच राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला नजीकच्या शाळेत इयत्ता ८ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या शाळेला इयत्ता ५ वी चा वर्ग तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या शाळेला इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यास संदर्भाधीन क्र.(१२) येथील शासन पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याचबरोबर, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग जोडण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्राधिका-यांच्या / सनियंत्रण अधिका-यांच्या शिफारशीसह शासनास सादर करावयाचे निर्देश देण्यात आले होते. या निर्देशानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्र. (७) ते (११) येथील पत्रान्वये राज्यातील खाजगी मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यास मान्यता देण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय-

राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून सोबत दर्शविल्याप्रमाणे सहपत्र अ, ब,क व ड नुसार इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थी च्या प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी चा वर्ग तसेच सहपत्र इ, ई, उ व ऊ नुसार राज्यातील इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी च्या उच्च प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग जोडण्यास खालील अटींच्या व शर्तींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे. या वर्गांचे वाटप शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावे.

१) शाळेला वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

२) या आदेशान्वये ज्या शाळांना वर्ग मंजूर करण्यात आलेले आहे त्या शाळांची पट संख्या विहीत निकषांप्रमाणे असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी करावी.

३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये शाळांनी भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

मुख्याध्यापिका
भारतीय विद्या निकेतन विद्यालय
सांगवी पुणे-२७

४) या आदेशान्वये मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शाळांमधील इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी च्या अतिरिक्त वर्गांना शासन मान्यता दिल्यामुळे अनुदानाचा कोणताही हक्क प्राप्त होत नाही. या वर्गांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

५) तसेच संदर्भाधिन क्र. (५) येथील दिनांक २८ ऑगस्ट,२०१५ च्या शासन निर्णयान्वये नैसर्गिक वाढ बंद करण्यात आलेली असल्याने इयत्ता ५ वी नंतर तसेच इयत्ता ८ वी नंतर प्रस्तुत शाळांना नैसर्गिक वाढ लागू राहणार नाही.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३१०१६१०१४२५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hemant
Sudhakar
Pathak

Digitally signed by Hemant Sudhakar Pathak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra,
ou=Section Officer, postalCode=400032,
st=Maharashtra,
2.5.4.20=1a58924bb1ebc2ed6699e048bfa42ad41d
d32de1e3eda84d0c030404173905e,
serialNumber=ee03447353a43cf2a3547cbc136e4960
2a70ef183cf433073e31735e6ad171a6, cn=Hemant
Sudhakar Pathak
Date: 2016.03.10 16:16:27 +05'30'

(हे.सु.पाठक)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग), यांचे स्वीय सहाय्यक,
३) मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे,
४) शिक्षण संचालक(प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे,
५) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परीषद,
७) आयुक्त, सर्व महानगरपालिका,
८) मुख्याधिकारी,सर्व नगरपरिषद/नगरपालिका,
९) सर्व शिक्षणाधिकारी(प्राथमिक), सर्व जिल्हा परिषद,
१०) सर्व शिक्षण निरीक्षक(पश्चिम/दक्षिण/उत्तर), बृहन्मुंबई, महानगरपालिका,
११) निवडनस्ती-(एसएम-५).

मुख्याध्यापिका
भारतीय विद्या निकेतन विद्यालय
सांगवी पुणे-२७

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७५ | श्री. दत्त बहु. विकास मंडळ सचलित संजयमामा शिंदे प्राथमिक विद्यामंदीर, शिवाजीनगर मोडनिब ता.माढा, जि. सोलापूर | मराठी | ५ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| | जिल्हा वर्धा | | | | |
| ७६ | स्वामी विवेकानंद आर्वी जिल्हा वर्धा | मराठी | ५ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| | जिल्हा पुणे | | | | |
| ७७ | भारतीय विद्या निकेतन प्राथ. विद्यालय सांगवी जिल्हा पुणे | मराठी | ५ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| | जिल्हा जळगांव | | | | |
| ७८ | गिरणाई शिक्षण संस्था,संचलित नविन आदर्श प्राथमिक शाळा वॉर्ड नं. ६ पाचोरा जिल्हा जळगांव | मराठी | इ. ५ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ७९ | श्री. पी. एल.नेमाडे प्राथमिक विद्यामंदीर शाळा जिल्हा जळगांव | मराठी | इ. ५ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| | जिल्हा बीड | | | | |
| ८० | जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालय, अंबाजोगाई,जि.बीड | मराठी | ५वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| | जिल्हा जालना | | | | |
| ८१ | जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ मंठा संचलित रेणुका प्राथमिक शाळा मंठा ता. मंठा जि जालना | मराठी | ५ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ८२ | रामचंद्र सांस्कृतीक क्रिडा मंडळ संचलित भारत प्राथमिक विद्यालय रेवगाव रोड, जालना. | मराठी | ५ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ८३ | शहिद भगतसिंह क्रिडा व सांस्कृतीक मंडळ औरंगाबाद संचलित शहिद भगतसिग विद्यामंदीर औद्योगीक वसाहत जालना | मराठी | ५ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ८४ | अंकूश शिक्षण प्रसारक संस्था औरंगाबाद संचलित अंकूर बालक मंदीर डबल जीन जूना जालना | मराठी | ५ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |
| ८५ | तांबे एज्युकेशन सोसायटी दहीसर मुंबई संचलित डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यानिकेतन, पिंपळखेडा ( गरड) ता. परतूर जि. जालना | मराठी | ५ वी | २०१४-१५ | विनाअनुदानीत तत्वावर |

मुख्याध्यापिका
भारतीय विद्या निकेतन विद्यालय
सांगवी पुणे-२७

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.६३/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ८ फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना -

अरविंद एज्युकेशन सोसायटी, ३१, शितोळेनगर, सांगवी, ता. हवेली, जि. पुणे संचलित भारतीय विद्यानिकेतन विद्यालय, शितोळेनगर, ता. हवेली, जि. पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास दर्जावाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत अरविंद एज्युकेशन सोसायटी, ३१, शितोळेनगर, सांगवी, ता. हवेली, जि. पुणे संचलित भारतीय विद्यानिकेतन विद्यालय, शितोळेनगर, ता. हवेली, जि. पुणे या शाळेस (प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक ते माध्यमिक, इयत्ता ६ वी ते १० वी, मराठी माध्यम, राज्यमंडळ) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहायित तत्वावर दर्जावाढ करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

मुख्याध्यापिका
भारतीय विद्या निकेतन विद्यालय
सांगवी पुणे-२७

(३) परवानगी देण्यात आलेल्या शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(६) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना नोडल **अधिकारी** म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(आ.ना. भोंडवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

मुख्याध्यापिका
भारतीय विद्या निकेतन विद्यालय
सांगवी पुणे-२७